केसरी
26/12/18

# ग. दि. माडगूळकर यांनी सामान्य माणसाच्या हृदयात घर केले : डॉ. श्रीपाद जोशी

जत : प्रतिनिधी

ग. दि. माडगूळकर यांनी सामान्य माणसांच्या हृदयात घर केले. सामान्य माणसांना त्यांनी आपलेसे केले म्हणून त्यांचे साहित्य, गीत रामायण व अनेक भावगीते घराघरांत आजही आवडीने ऐकतात, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. श्रीपाद जोशी यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे 'प्राध्यापक प्रबोधिनी'अंतर्गत आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रारंभी प्राध्यापक प्रबोधिनीचे समन्वयक प्रा. एस. डी. चव्हाण यांनी प्रास्ताविक व स्वागत करून प्राध्यापक प्रबोधिनीमागील उद्देश स्पष्ट केला.



जत येथील आर. आर. महाविद्यालयात 'प्राध्यापक प्रबोधिनी'अंतर्गत आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाद जोशी यांनी गदिमांवर व्याख्यान दिले.

ग. दि. माडगूळकर यांचे बहुतेक लेखन आत्मप्रकटीकरण व सौंदर्य शोध यातून जन्मलेले आहे. त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते, असे सांगून डॉ. श्रीपाद जोशी म्हणाले की, गीते, कविता, सांगीतिका, गीतकाव्ये, नाट्यनाटिका, काव्यगीते, कथा, कादंबरी, नाटक, ललित गद्य, प्रवासवर्णन बालगीते, आत्मवृत्त अशा विविध वाङ्मय प्रकारात लेखन केले. कलेच्या आणि वाङ्मयाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात जे कार्य केले, ते उल्लेखनीय आहे. ग. दि. माडगूळकर हे सांगली जिल्ह्याला लाभलेले लेणे आहे.

अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे म्हणाले की, ग. दि. माडगूळकर यांच्या चरित्रातून एक प्रकारची ऊर्जा मिळते. शून्यातून विश्व कसे उभे करावे, हे ग. दि. माडगूळकर यांच्याकडे पाहिल्यानंतर कळते. ग. दि. माडगूळकर यांची भावगीते आजही मनाला भुरळ घालतात. सूत्रसंचालन प्रा. दिनकर कुटे यांनी केले. आभार प्रा. अशोक हेरवाडे यांनी मानले.

27/12/18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
26/12/2018

# राजे रामराव महाविद्यालयात तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

जत, (प्रतिनिधी): राजे रामराव महाविद्यालय, जत येथे पदार्थ विज्ञान विभागाच्यावतीने दि. २७, २८ व २९ डिसेंबर २०१८ रोजी तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये जास्तीत जास्त संशोधकांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, समन्वयक प्रा. डॉ. संजय लट्ठे व पदार्थविज्ञान विभागप्रमुख प्रा. डॉ. आप्पासाहेब भोसले यांनी केले आहे.

अडव्हान्ससेस इन मटेरियल सायन्स या विषयावर पदार्थविज्ञान विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेस बांग्लादेश येथील कतार युनिव्हर्सिटी कतार येथील प्रा. डॉ. अबूबक्र अब्दुल्ला यांच्यासह त्यांचे पाच सहकारी संशोधक तसेच आफ्रिकेतील म्युनिआ कोनाक्रे येथील हायर इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजि ऑफ ममाऊ येथील प्रा. हब्बा पॉल व झाम्बिया येथील युनिव्हर्सिटी ऑफ झाम्बिया प्रा. इब्रिमा डारबो, नेपाळ मधील त्रिभुवन युनिव्हर्सिटी, कीर्तीपूर येथील प्रा. प्रवीण शर्मा सहभागी होणार आहेत.

विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यामध्ये संशोधनाचे आदान-प्रदान व्हावे हा परिषदेमागील हेतू

(पान ३ वर)

## जत येथे तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

असून या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये राजे रामराव महाविद्यालय, पदार्थविज्ञान विभाग व केमिकल इंजनिअरिंग होवान विद्यापीठ चीन यांच्यामध्ये आंतरराष्ट्रीय सामंजस करार होणार आहे. यापूर्वी २०१६ मध्ये जपान येथील टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स यांच्या बरोबर सामंजस्य करार करण्यात आला होता. या आंतरराष्ट्रीय परिषदेस तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉग्यूक विद्यापीठ, साऊथ कोरिया, युनिव्हर्सिटी ऑफ टॉरिओ इटली, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पुणे विद्यापीठ, अमरावती विद्यापीठ, इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, मुंबई येथील प्राध्यापक तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तरी पदार्थविज्ञान विषयाच्या संशोधकांनी या परिषदेद आपले संशोधनपर निबध पाठवावेत व आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ व्ही. एस. ढेकळे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. के. भोसले व आंतरराष्ट्रीय परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ संजय लट्ठे यांनी केले आहे.

Shelke
26/12/18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
24/12/2018




# वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे मन शांत आनंदमय होते

जत,(प्रतिनिधी):

वैज्ञानिक दृष्टिकोन बिघडला कि सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व वैचारिक असे सर्वच दृष्टिकोन बिघडतात म्हणून माणसाकडे कोणत्याही गोष्टीकडे पाहताना वैज्ञानिक दृष्टिकोन महत्वाचा आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे सकारात्मक भावना निर्माण होऊन मन स्थिर, शांत व आनंदमय होते असे प्रतिपादन प्रा. बाबासाहेब बेंडेपाटील यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे राज्यशास्त्र विभागाच्या वतीने

(पान ३ वर)

(पान १ वरून)

आयोजित केलेल्या 'महाराष्ट्र विवेक वाहिनी ' उद्घाटन प्रसंगी संताचा वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.सी.वाय. मानेपाटील यांनी महाराष्ट्र विवेक वाहिनी व अंधश्रद्धा या विषयी माहिती दिली.प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे म्हणाले कि, मानवी जीवनामध्ये तर्कशास्त्र महत्वाचे आहे. आपणाला प्रत्येक गोष्टीत तर्क लावता आला पाहिजे. आजही भारतीय जनतेमध्ये देव आणि धर्माचा पगडा जन्मजातच आहे. पण केवळ धार्मिक भावनेने कर्मकांड न करता वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून श्रद्धा ठेवली पाहिजे. कर्मकांडामुळे मानसिक गुलामगिरी नष्ट करावयाची असेल तर प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर तपासून पहिली पाहिजे प्रारंभी अंधश्रद्धेवर बनविणेत आलेल्या भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाराष्ट्र विवेक वाहिनीचे जतचे प्रमुख प्रा.सी.वाय.मानेपाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सागर सन्नके व शेवटी आभार प्रा. पुंडलिक चौधरी यांनी केले.

Scanned by CamScanner

लोकमत
20/12/2018

# कल्पकतेतूनच नवनिर्मितीची शक्यता : ढेकळे

लोकमत न्यूज नेटवर्क

जत : माणसाच्या अंगी कल्पकता, सजगता आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर, नवनिर्मिती करता येऊ शकते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.

सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी डॉ. श्रीकांत कोकरे यांची निवड झाली. याबद्दल त्यांचा राजे रामराव महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

प्रशासनात काम करीत असताना संवेदनशीलता व संहिता महत्त्वाची असते. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन ही प्रक्रिया संवेदनशील असल्याने ते सावध पध्दतीने केले पाहिजे, असेही प्राचार्य ढेकळे म्हणाले.

डॉ. श्रीकांत कोकरे म्हणाले, परीक्षा नियंत्रक व मूल्यमापन म्हणून काम करीत असताना विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कशा पद्धतीने कमी करता येईल, याचा प्रयत्न निश्चितच केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

डॉ. विजय जाधव यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. प्रा. आर. डी. कारंडे, प्रा. सोमनाथ काळे, प्रा. डॉ. राजेंद्र लवटे, प्रा. रामदास बनसोडे, प्रा. संजय लट्ठे, प्रा. सचिन लोखंडे, प्रा. सी. वाय.

Scanned by CamScanner

तरुण भारत

19/12/2018

# कल्पकता व सजगता असेल तर नवनिर्माणता शक्य

## डॉ.व्ही.एस.ढेकळे : डॉ.कोकरे यांची परीक्षा नियंत्रक व मूल्यमापन मंडळ संचालकपदी नेमणूक

प्रतिनिधी
जत

माणसाच्या अंगी कल्पकता, प्रयोग, सजगता आणि कष्ट करावयाची तयारी असेल तर नवनवीन प्रयोग करून नवनिर्मानता करता येऊ शकते आपण याचा अंगीकार करून परीक्षा विभागात नवनिर्मानता करावी असे प्रतिपादन डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.

ते डॉ. श्रीकांत कोकरे यांची सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी नेमणूक झालेबद्दल त्यांचा राजे रामराव महाविद्यालयात सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी डॉ. श्रीकांत कोकरे यांचा प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी शाल, श्रीफळ व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रशासनात काम करीत असताना संवेदनशीलता व संहिता महत्वाचे असते. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हि प्रक्रिया संवेदनशील असल्याने ते सावध



जत : डॉ. श्रीकांत कोकरे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे व अन्य.

पध्दतीने केले पाहिजे. विवेकानंद परिवारातील माणूस हा शेवटपर्यंत विवेकानंद परिवारातच राहावा अशी संस्थेची इच्छा आहे. पण संस्थेच्या एका सदस्याला एका मोठ्या पदावर काम करण्याची संधी मिळते म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था परिवार त्यांच्या पाठीशी आहे असेही ते म्हणाले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. श्रीकांत कोकरे म्हणाले की, परीक्षा ही बाब विद्यार्थ्यांच्या मूल्यमापना बरोबरच त्यांच्या संवेदनशील मनाशी निगडित आहे. या विश्वात वस्तूचे एकक मोजण्याचे परिमाण अस्तित्वात आहे. पण मनाचे एकक मोजण्याचे कोणतेही साधन उपलब्ध नाही. परीक्षा नियंत्रक व मूल्यमापन म्हणून काम करीत असताना विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कशा पध्दतीने कमी करता येईल याचा पयत्न निश्चितच केला जाईल असे डॉ. श्रीकांत कोकरे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत स्टाफ सेक्रेटरी डॉ. विजय जाधव यांनी केले. याप्रसंगी प्रा. आर. डी. कारंडे, प्रा. सोमनाथ काळे, प्रा. डॉ. राजेंद्र लवटे, प्रा. रामदास बनसोडे, प्रा. संजय लट्ठे, प्रा. सचिन लोखंडे यांनी आपल्या भावना व्यक्त करून डॉ श्रीकांत कोकरे यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सी. वाय. मानेपाटील यांनी केले तर आभार प्रा. समीर शेख यांनी केले.

20/12/18

Scanned by CamScanner

तरुण भारत शुक्रवार दि. ७ डिसेंबर २०१८

# शिक्षण आणि संघटित होणे हा लोकशाहीचा पाया : प्राचार्य ढेकळे



जत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे व अन्य.

प्रतिनिधी

जत

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मानवाला दिलेला महामंत्र आहे. ज्ञान आत्मसात केल्याशिवाय मानवाची प्रगती होत नाही आणि आपल्या हक्कासाठी संघटित होणे हा लोकशाहीचा प्राण आहे असे प्रतिपादन प्र. प्राचार्य. डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलत होते. प्रारंभी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. आर. बी. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले.

विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र वाङ्मयाचा आभ्यास करावा. अभ्यासाने विद्यार्थ्यांना आपल्या हक्काची व कर्तव्याची जाणीव होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण हा सामाजिक सुधारणेचा पाया आहे. मानवाच्या अंगी प्रज्ञा, शिल आणि करूना हे गुण आणण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. आपणास बौध्दिकदृष्ट्या सक्षम व्हायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य वाचले पाहिजे. त्यांच्या साहित्यातून सामाजिक भावनेचा विकास होण्यास मदत होते.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते करण्यात आले. सुत्रसंचालन प्रा. कुमार इंगळे यांनी तर आभार प्रा. डॉ. सोमनाथ काळे यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. आर. बी. पाटील, प्रा. भीमाशंकर डहळके व प्रा. सौ. एन. व्ही. मोरे यांनी केले.

Scanned by CamScanner

तरुण भारत

29/1/2019

# विद्यार्थ्यांकडे ज्ञानपिपासूवृत्ती असली पाहिजे : डॉ. चव्हाण

प्रतिनिधी
जत

जीवनाच्या सर्व अंगाला भूगोलाचा स्पर्श आहे. दैनंदिन जीवनात भूगोलाशिवाय पाणही हालत नाही. मात्र विद्यार्थ्यांकडे ज्ञानपिपासूवृत्ती असली पाहिजे असे प्रतिपादन कवठेमहांकाळ येथील पी. व्ही. पी. महाविद्यालयाचे भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. चव्हाण यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय जत येथे राजे रामराव सुवर्णमहोत्सवी वर्ष व डॉ. बापुजी साळुंखे यांची जन्म शताब्दी वर्षा निमित्त भूगोलशास्त्र विभागाच्या वतीने विषयातील संधी या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सी. वाय. मनेपाटील हे होते. प्रारंभी भूगोल विभाग प्रमुख प्रा. एस. डी. चव्हाण यांनी कार्यक्रमाचा उद्देश आपल्या प्रास्ताविकात सांगितला.

प्रा. सी. वाय. मानेपाटील म्हणाले, येणारा क्षण कसा आहे हे मानवाला सांगता येत नाही. माणसाने नेहमी आनंदी राहण्यासाठी पर्यटन केले पाहिजे. पर्यटनाच्या निमित्ताने संपूर्ण भारताबरोबरच जग हि पाहिजे. त्यासाठी भूगोलाची माहिती असणे गरजेचे आहे. ज्या भागात आपणास पर्यटन करावयाचे आहे त्या भागाचे आपणास भूगोलव्दारे ज्ञान प्राप्त होऊ शकते. प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते भूगोल विभागाच्या वतीने वसुंधरा भित्तीपत्रीकेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कु. मेघा साळुंखे हिने भूगोल विषयावर तयार करण्यात आलेल्या चिकट पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्रा. एस. डी. चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सरस्वती चव्हाण हिने केले. तर आभार प्रा. ए. टी. शिंदे यांनी मानले. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. आर. बी. पाटील, प्रा. युवराज शिंदे उपस्थित होते.

30/1/19

Scanned by CamScanner

* पुढारी *

27/11/2018

# जतमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा

**येळवी : वार्ताहर**

संविधान हे भारतीय जनतेचे दीपस्तंभ आहे. भारतीय जनतेचा जगण्याचा आधार आहे. आपण २१ व्या शतकात वावरत असताना माणसांच्या मनातील जात आणि धर्म नष्ट होत नाही. हे आपल्या भारतीयांचे दुर्दैव आहे, असे प्रतिपादन प्र. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय जत राज्यशास्त्र विभागाच्यावतीने संविधान दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सी. वाय. माने-पाटील हे होते. यावेळी डॉ. श्रीकांत कोकरे, प्रा. एस. डी. चव्हाण, प्रा. डॉ. भीमाशंकर डहाळके, प्रा. श्रीमंत ठोंबरे प्रमुख उपस्थित होते.

28/12/18

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
25 जानेवारी 2019

# मनावरचा ताण स्वर गायनाने निघून जातो : प्राचार्य डॉ.ढेकळे

जत,(प्रतिनिधी):मनावरचा ताण सारे गम पध नि सा या सप्तस्वराने निघून जातो. सांस्कृतिक समृद्धी आली की मनाची समृद्धी येते. मन विकासाच्या दिशेने जाण्यासाठी सांस्कृतिक समृद्धी महत्वाची आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही.एस.ढेकळे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्ष व राजे रामराव महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीच्या सदस्या श्रीमंत जोत्सनाराजे डफळे या होत्या प्रारंभी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व श्रीमंत रामराव महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन श्रीमंत जोस्त्नाराजे डफळे यांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्राचार्य डॉ.ढेकळे पुढे म्हणाले कि, कला हि मानवाच्या जीवनात समृद्धी निर्माण करुन समाजाला विचार देण्याचे काम करीत असते. कलेच्या माध्यमातून रसिकांच्या मनाची मशागत होत असते. आणि मनाची मशागत झाली की विचारांचे पिक अमाप येते म्हणून अशा सांस्कृतिक कार्यक्रमाची गरज आहे,असे ते शेवटी म्हणाले.

प्रा.बाबासाहेब बेंडेपाटील यांनी प्रस्ताविक केले. स्वामी विवेकानंद सप्ताहनिमित्त घेण्यात



आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.सूत्रसंचालन प्रा.सी.वाय. मानेपाटील,आभारप्रदर्शन प्रा. कुमार इंगळे यांनी केले.

दै.तरुण भारत - 25-1-2019

## मनावरचा ताण स्वर गायनाने निघून जातो

जत : मनावरचा ताण सारे गम पध नि सा या सप्तस्वरांनी निघून जातो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्ष व राजे रामराव महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

Scanned by CamScanner

* लोकमत *

17 जानेवारी 2019

# राष्ट्रीय एकता जपण्याचे सामर्थ्य हिंदी भाषेमध्ये

## व्ही. एस. ढेकळे : जतमध्ये विश्व हिंदी दिवस

लोकमत न्यूज नेटवर्क

जत : भारत हा खंडप्राय देश असून, विविधतेने नटलेला आहे. या विविधतेमध्ये एकता राखण्याचे सामर्थ्य हिंदी भाषेत आहे. ज्याप्रमाणे मराठी भाषेत मधुरता आहे, त्याचप्रमाणे हिंदी भाषेतही गोडवा आहे. मराठी व हिंदी यांची देवनागरी ही एकच लिपी आहे. म्हणून सर्वांनी हिंदी भाषेचे अध्ययन करावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.

जत येथील राजे रामराव महाविद्यालयाच्या हिंदी विभागातर्फे विश्व हिंदी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हिंदी विभागप्रमुख प्रा. एच. डी. टोंगारे होते. प्रारंभी प्रा. सतीशकुमार पडोळकर यांनी विश्व हिंदी दिवसाची माहिती दिली.

प्रा. टोंगारे म्हणाले, आज जगामध्ये दोन नंबरला हिंदी भाषा बोलली जाते. हिंदी बोलणाऱ्यांची संख्या जगामध्ये वाढत आहे. अमेरिकेमध्ये कॉमर्सच्या विध्यार्थ्यांना हिंदी भाषा शिकविली जाते. चीन, जर्मनी, जपान, इटली, श्रीलंका आदी देशात द्वितीय भाषा म्हणून महाविद्यालयांमध्ये हिंदी भाषा शिकविली जाते. आज जपानमध्ये ८२५ महाविद्यालयांमध्ये हिंदी भाषा शिकविली जाते.

26/1/19

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
बुधवार ता. १६ जानेवारी २०१९

# विविधतेत एकता निर्माण करण्याची ताकद हिंदी भाषेत



जत,(प्रतिनिधी):भारत हा खंडप्राय देश असून विविधतेने नटलेला आहे. या विविधतेमध्ये एकता राखण्याचे सामर्थ्य हिंदी भाषेत आहे.ज्या प्रमाणे मराठी भाषेत मधुरता आहे त्याचप्रमाणे हिंदी भाषेतही गोडवा आहे. मराठी व हिंदी यांची देवनागरी ही एकच लिपी आहे. म्हणून सर्वांनी हिंदी भाषेचे अध्ययन करावे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे यांनी केले.ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे हिंदी विभागाच्या वतीने विश्व हिंदी दिवस या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हिंदी विभाग प्रमुख प्रा. एच.डी.टोंगारे हे होते.

प्रारंभी प्रा. सतीशकुमार पडोळकर यांनी विश्व हिंदी दिवस याविषयी माहिती दिली.कोणतेही साहित्य अवघड नाही फक्त त्याचे मनापासून अध्ययन केले पाहिजे. साहित्याचे आपण वाचन केले पाहिजे कारण साहित्य हे आपल्यामध्ये उर्जा, चेतना निर्माण करून जगण्यासाठी चांगल्या संस्काराची शिदोरी देत असते असे सांगून प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे पुढे म्हणाले कि, माणसाला माणूस बनवण्याचे काम साहित्य करीत असते. माणसाच्या मनाची मशागत करण्याचे काम साहित्य करीत असते म्हणून साहित्याचे अध्ययन केले पाहिजे असेहि ते शेवटी म्हणाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा. एच.डी.टोंगारे म्हणाले कि, आज जगामध्ये दोन नंबरला हिंदी भाषा बोलली जाते. हिंदी बोलनार्यांची संख्या जगामध्ये वाढत आहे. आज जपानमध्ये महाविद्यालयामध्ये हिंदी भाषा शिकविली जाते असे सांगून प्रा. एच.डी.टोंगारे पुढे म्हाणाले कि, हिंदी भाषेत अनेक रोजगारांच्या संधी दिवसेंदिवस उपलब्ध होत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराचे संधी उपलब्ध आहेत. म्हणून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचे अध्ययन करावे असे सांगून ते शेवटी म्हणाले कि, विध्यार्थ्यानी साहित्याचे वाचन केले पाहिजे. कारण साहित्य हे मानवाला नीतिमान बनवते.प्रारंभी विश्व हिन्दी दिन निमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेमध्ये यश मिळविलेल्या विध्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीशकुमार पडोळकर व शेवटचे आभारप्रदर्शन प्रा. कु. यु. डी.देशमुख यांनी मानले.

26/1/19

Scanned by CamScanner

तरुण भारत
सोमवार दि. ७ जानेवारी २०१९

# 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करावा लागतो हे दुर्दैव'

प्रतिनिधी
जत

मराठी राज्याची राज्यभाषा असून ती आज संकटात सापडली आहे. प्रत्येक राज्यांनी आपल्या राज्यभाषेचा दर्जा कायम ठेवला आहे. मग मराठीचीच उपेक्षा का होत आहे. आज मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करावा लागतो ही दुर्दैवी घटना आहे, अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाद जोशी यांनी व्यक्त केली आहे.

ते राजे रामराव महाविद्यालय जत येथे मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा पंधरवडा दिन साजरा करण्यात येतो. त्यांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे हे होते. प्रारंभी मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. एन. व्ही. मोरे यांनी आपल्या प्रास्ताविकात 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यामागील उद्देश सांगितला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे म्हणाले की, आज सर्वांनी मराठीच व्यवहार करण्याची गरज आहे. यासाठी विद्यार्थी शिक्षकांनी पुढाकार घेतला पाहिजे असे सांगून ते पुढे म्हणाले की, आज समाजात इंग्लिश मेडियमचे फॅड आले आहे. पण "मातृभाषेतूनच दिलेले शिक्षणचं परिपूर्ण आहे. आज जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची मुलेचं इंग्लिश मिडीयमला जात आहेत. यासाठी मराठीच्या अधोगतीला मराठी शिक्षकच जबाबदार आहेत.

शिक्षकांनी मराठी भाषेवर प्रेम केले पाहिजे. वाचन संस्कृती समाजात रूजविली पाहिजे. मातृभाषा हीच संस्काराची, ज्ञानाची भाषा आहे हे विसरून चालणार नाही. या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी विभागाच्या वतीने हस्ताक्षर स्पर्धा निबंध स्पर्धा, शुध्दलेखन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन मराठी विभागाच्या वतीने करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुरेखा व्हनमाने यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दिनकर कुटे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. कुमार इंगळे यांनी केले.

8/1/19

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स

शुक्रवार ता. ४ जानेवारी २०१९

# राजे रामराव महाविद्यालयात राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन

जत,(प्रतिनिधी): श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त व राजे रामराव महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राजे रामराव महाविद्यालय, जत येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन ८ व ९ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर केले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एस.ढेकळे, क्रीडा संचालक प्रा.श्रीमंत ठोंबरे व प्रा.सिद्राम चव्हाण यांनी दिली.राजे रामराव महाविद्यालयाला गौरवशाली अशी क्रीडा परंपरा आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संस्थेच्या कार्यक्षेत्रामधून १३ जिल्ह्यातुन ६८ ज्युनीअर कॉलेज व २६ सिनिअर महाविद्यालयाचे मुला - मुलींचे संघ या स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत.क्रीडा स्पर्धा चार गटात संपन्न होणार असून यामध्ये १०० मी,२०० मी, ४०० मी,८०० मी,१५०० मी व १५000 मी धावनेच्या स्पर्धेबरोबरच रिले, गोळाफेक, थाळीफेक, लांबउडी अशा भरगच्च क्रीडास्पर्धा संपन्न होणार आहेत. या क्रीडा स्पर्धेचे उदघाटन सांगली जिल्हा मध्यावर्ती बँकेचे उपाध्यक्ष मा.विक्रमदादा सावंत, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली व जत संस्थेचे श्रीमंत इंद्रजितराजे डफळे, श्रीमंत शार्दुलराजे डफळे व सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मा. सुरेशराव शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. यापूर्वीही राजे रामराव महाविद्यालयाचे विद्यापीठ स्तरीय, राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उत्तमरीत्या आयोजन केले आहे.

Scanned by CamScanner

दै. युवकांचा
नवा महाराष्ट्र
शुक्रवार
४ जानेवारी २०१९

# राजे रामराव महाविद्यालयात राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन

जत : प्रतिनिधी–

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त व राजे रामराव महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त राजे रामराव महाविद्यालय, जत येथे राज्यस्तरीयं क्रीडा स्पर्धेचे आयोजन ८ व ९ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर केले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एस.ढेकळे, क्रीडा संचालक प्रा.श्रीमंत ठोंबरे व प्रा.सिद्राम चव्हाण यांनी दिली

राजे रामराव महाविद्यालयाला गौरवशाली अशी क्रीडा परंपरा आहे. महाविद्यालयाचे अनेक खेळाडू महाराष्ट्रातील २८ जिल्ह्याचे जिल्हा क्रीडाधिकारी म्हणून काम करीत आहेत. तसेच राज्याचे क्रीडा संचालकही या महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संस्थेच्या कार्यक्षेत्रामधून १३ जिल्ह्यातुन ६८ ज्युनीअर कॉलेज व २६ सिनिअर महाविद्यालयाचे मुला – मुलींचे संघ या स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत.क्रीडा स्पर्धा चार गटात संपन्न होणार असून यामध्ये १०० मी, २०० मी, ४०० मी , ८०० मी, १५०० मी व १५००० मी धावनेच्या स्पर्धेबरोबरच रिले, गोळाफेक, थाळीफेक, लांबउडी अशा भरगच्च क्रीडास्पर्धा संपन्न होणार आहेत.

या क्रीडा स्पर्धेचे उदघाटन सांगली जिल्हा मध्यावर्ती बँकेचे उपाध्यक्ष मा.विक्रमदादा सावंत, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली व जत संस्थेचे श्रीमंत इंद्रजितराजे डफळे, श्रीमंत शार्दुलराजे डफळे व सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मा. सुरेशराव शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

यापूर्वीही राजे रामराव महाविद्यालयाचे विद्यापीठ स्तरीय, राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उत्तमरीत्या आयोजन केले आहे.

५।१।१९

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स

बुधवार ता. ६ फेब्रुवारी २०१९

# जिल्हा परिषदेतील शिक्षकांनी इंग्रजी विषयामध्ये अपडेट राहावे :प्रा.ढेकळे

जत,(प्रतिनिधी) ;विद्यार्थी आणि पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाच्या शाळेकडे वाढत आहे. प्राथमिक स्तरावर हि एक मोठी समस्या आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी स्वतःला अपडेट करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.व्ही. एस. ढेकळे यांनी केले.ते राजे रामराव महाविद्यालय, जत येथे इंग्रजी विभागाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी इंग्रजी विषय शाळेत शिकविण्याच्या विविध पद्धती या विषयावर आयोजित एक दिवशीय कार्यशाळेच्या उद्धाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी विषयतज्ञ म्हणून विवेकानंद कॉलेज, कोल्हापुरचे प्रा.डॉ.सौ.श्रुती जोशी म्याडम, प्रा.डॉ.जयंत कुलकर्णी व जत पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मा.बी.एन. जगधाने उपस्थित होते. प्रारंभी इंग्रजी विभागप्रमुख प्रा.आर.डी. कारंडे यांनी एक दिवशीय कार्यशाळेचा उद्धेश सांगितला. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे.शिक्षकांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा शिक्षणपद्धतीत अवलंब केला पाहिजे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना जे जे मिळते ते ते जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांना दिले पाहिजे त्यासाठी प्राथमिक शाळेतील शिक्षाकांनी नेहमी अपडेट राहिले पाहिजे असे सांगून प्राचार्य डॉ.व्ही. एस. ढेकळे पुढे म्हणाले कि, मराठी शाळेत शिकविणार्या शिक्षकांनी इंग्रजी विषयाच्या निरनिराळ्या अध्यापन पद्धतीचा अवलंब केला पाहिजे.प्राथमिक स्तरापासुनच मुलांना सोप्या भाषेत इंग्रजीचे पाध्यापण केले पाहिजे. त्यासाठीच राजे रामराव महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने या नाविन्यपूर्ण कार्यशाळेचे आयोजन केले आहे असेही ते शेवटी म्हणाले.

7/2/19

Scanned by CamScanner

पुढारी

बुधवार, ६ फेब्रुवारी २०१९



जत : राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिरात उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.व्ही.एस. ढेकळे.

# एनएसएसमुळे मन, मनगट व मेंदू बळकट : डॉ. ढेकळे

जत : शहर प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) हे समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना मानसिक, शारीरिक, सामाजिक व राष्ट्रीय दायित्वाच्यादृष्टीने प्रगल्भ बनविण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कोसारी (ता. जत) येथे होणाऱ्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्रीनिवास भोसले हे होते.

मुख्याध्यापक सुरेश सावंत म्हणाले, संस्कार घडविण्यासाठी उत्तम मार्ग म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. अलिकडे विद्यार्थ्यांच्यात असणारी श्रमप्रतिष्ठा कमी होत चालली आहे. अशा शिबिरातून श्रमाचे महत्त्व पटवून विद्यार्थ्यांवर श्रमाचे संस्कार केले जातात. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर म्हणजे श्रम प्रतिष्ठेची कार्यशाळाच आहे.

पंचायत समिती सदस्या अर्चना पाटील, सरपंच तानाजी बिसले, बाळासो पवार, युवा नेते नाथाजी पाटील, सामाजिक कार्यकर्ते विक्रम ढोणे, सुरेश खरात, मुख्याध्यापक विनायक शिंदे, बाबूराव मोरे, युवक नेते चंद्रकांत कांबळे यांनी श्रमदान केले. जत तालुका रासपचे अध्यक्ष किसन टेंगले यांनी मुलांना टी शर्ट भेट दिले. शिबिरात १२५ स्वयंसेवक-स्वयंसेविका सहभागी झाले आहेत. आठवडाभर विविध उपक्रम आयोजित केले जाणार आहेत.

7/2/19

Scanned by CamScanner

संकेत टाइम्स
ता. ४ फेब्रुवारी २०१९

# राष्ट्रीय सेवा योजना हे मन, मनगट आणि मेंदू बळकट करण्याचे प्रभावी माध्यमः प्राचार्य डॉ.ढेकळे

जत,(प्रतिनिधी):राष्ट्रीय सेवा योजना हे समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना मानसिक, शारीरिक, सामाजिक व राष्ट्रीय दायित्वाच्या दृष्टीने प्रगल्भ बनविण्याचे प्रभावी माध्यम आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजना ही भेदाभेद अमंगळ आहे ही शिकवण देणारी योजना आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.व्ही.एस. ढेकळे यांनी केले.ते राजे रामराव महाविद्यालयाच्या कोसारी ता. जत येथे संपन्न होणाऱ्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घघाटन प्रसंगी बोलत होते.

प्रास्ताविक व स्वागत डॉ.बी. एम. डहाळके यांनी केले.कोसारीचे मुख्याध्यापक सुरेश सावंत म्हणाले, संस्कार घडविण्यासाठी उत्तम मार्ग म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय.शहाजी चव्हाण म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेकडून आदर्श घेऊन कोसारी गाव सुजलाम सुफलाम होईल ही अपेक्षा व्यक्त केली.



पं.स. सदस्या सौ. अर्चना पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीनिवास भोसले, सरपंच तानाजी बिसले, उपसरपंच बाळासो पवार, नाथाजी पाटील,विक्रम ढोणे, बापू महारनूर,सुरेश खरात, लतीफ मणेर, मुख्याध्यापक विनायक शिंदे,ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थीत होते. रासपचे अध्यक्ष किसन टेंगले यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकाना टीशर्ट

(पान ३ वर)

(पान १ वरून)

भेट दिले. शिबीरात १२५ स्वयंसेवक-स्वयंसेविका सहभागी झाले असून आठवडाभर कोसारी गावात 'स्वच्छ भारत-स्वस्थ भारत' अभियानांतर्गत ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, साक्षरता, गटचर्चा, सर्वेक्षण, लेक-वाचवा अभियान इ. विविध उपक्रमे आयोजित केले जाणार आहेत.सूत्रसंचालन प्रा. सतीशकुमार पडोळकर, आभार डॉ. राजेंद्र लवटे यांनी मानले.

5/2/19

Scanned by CamScanner

दै. लोकमत
०९/०२/२०१९



विमा ग्राम पुरस्काराचा चेक एल.आय.सी.चे शाखाधिकारी शशिकांत दाभाडे यांच्याहस्ते कोसारीचे सरपंच तानाजी बिसले, उपसरपंच बाळासाहेब पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

# कोसारी गावाला विमा ग्राम पुरस्कार

## ७५,००० रुपयांचा चेक प्रदान

जत : प्रतिनिधी

जत तालुक्यातील कोसारी गावामधून २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या विमा व्यवसायामुळे कोसारीला विमा ग्राम पुरस्कार प्राप्त झाला.

या पुरस्काराचे बक्षीस म्हणून ७५,००० रुपयांचा चेक एल.आय.सी. तर्फे शाखाधिकारी शशिकांत दाभाडे यांच्या हस्ते सरपंच तानाजी बिसले, उपसरपंच बाळासाहेब पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या बक्षीस रकमेतून गावामध्ये पाण्याची टाकी बांधण्याचा संकल्प केला आहे. यावेळी विमा ग्राम सन्मान दर्शवणाऱ्या बोर्डचे उद्घाटन प्राचार्य व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते करण्यात आले.

राजेरामराव महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाने सर्वांचे स्वागत व सत्कार केले. उमेश थोरात यांनी सर्वांचे अभिनंदन केले. वैभव तोरवे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि. प. सदस्य श्रीनिवास भोसले यांनी गावाला मिळालेल्या पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला. मुख्याध्यापक सुरेश सावंत, किसन टेंगले, लतिफ मणेर, दादासो महारनुर, विक्रम तोरवे, संभाजी टेंगले, सुरज तोरवे, नवनाथ टेंगले, गोपाळ साळे, विशाल सोनी, विनोद काबळे, बाबुराव मोरे, शंकर तोरवे, महेश तोरवे उपस्थित होते.

२१.२.१९

Scanned by CamScanner

रविवार ता. १० फेब्रुवारी २०१९ | संकेत टाइम्स

# संविधान हा भारतीय लोकशाहीचा आत्मा : डॉ. भिमाशंकर डहाळके

जत (प्रतिनिधी): संविधान हि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय लोकशाहीला दिलेली अनमोल देणगी असून ती लोकशाहीचा आत्मा आहे असे प्रतिपादन डॉ. भिमाशंकर डहाळके यांनी केले. ते कोसारी येथे राजे रामराव महाविद्यालय, जत राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीरात मार्गदर्शन करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. राजेंद्र लवटे हे होते.

डॉ.डहाळके पुढे म्हणाले, इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचे निश्चित झाल्यानंतर १९४६ ला कॅबिनेट मिशनची स्थापना झाली व मिशनच्या शिफारशींनी भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी प्रातिनिधिक संविधान समिती निर्माण झाली जिचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. त्या अंतर्गत असणा-या बावीस समित्यांपैकी अतिशय महत्त्वाची असणा-या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. घटनाकारांनी सांसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. ही शासनपद्धती जनतेच्या संमतीवर आधारलेली असते आणि त्यात विचार, आचार, संचार, उच्चार व संघटनेचे स्वातंत्र्य असते.

भारताची राज्य घटना ही संघराज्य पद्धतीने लोकशाही जोपासणारी आहे. संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय परिश्रमाने ही राज्यघटना लिहिली. त्यात त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या बुद्ध तत्त्वांचा समावेश केला आहे. भारतीय राज्य घटना कशी चालवावी, पक्ष आणि प्रशासन व्यवस्था, कायदे यंत्रणा, निरनिराळया योजना व राज्य, केंद्र शासनाची कर्तव्ये, न्यायालयाची कर्तव्ये व वेगवेगळया आयोगाची कर्तव्ये, राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री, राज्यपाल, सांसद लोकसभा, राज्यसभा यात निवडून येणा-या लोकांच्या भूमिका आणि कार्य-कर्तव्ये काय आहेत, यांचे संपूर्ण नियोजन भारतीय संविधानात नमूद केलेले आहे. ती योग्य प्रकारे देशातील जनतेच्या हितासाठी, समृद्धीसाठी व विकासासाठी राबवावी हे भारतीय संविधानाचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक जाती धर्माच्या लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे जगण्याची मुभा घटनेने दिली. तसेच कोणत्याही धर्मावर जबरदस्तीने धर्मातर न करण्याची अटही घातली आहे. भारतीय संविधानात प्रत्येक माणसाला त्याच्या इच्छेप्रमाणे धर्म स्वीकारण्याची व बदलण्याची मुभा दिलेली आहे. भारतीय संविधानात वेळप्रसंगी कायद्याच्या कलमांमध्ये बदल करण्याचा अधिकारही दिलेला आहे. शेवटी त्यांनी भारताची अखंडता व विविधता टिकविण्यासाठी संविधानाची यथायोग्य अंमलबजावणी करणे व तिचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

डॉ.लवटे म्हणाले की, भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशाची राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी राज्यघटना असून तिने भारतातील विविध जाती, धर्म, पंथ, वंश, समुदाय, गोत्र, भाषा राहणीमान, प्रांत या सर्वाना एका सूत्रात बांधून सर्वांना भारतीय लोकशाही प्रणाली बहाल केली आहे. सद्यपरिस्थितीतील राजकीय लोक नितीमान, साक्षर नसल्यामुळे तसेच काही लोकांच्या महत्त्वाकांक्षी धोरणा मुळे तरुण पिढी वेगवेगळ्या झेंड्याखाली गोळा होऊन सांस्कृतिक तत्त्वाला अडसर असणारी सांसदीय लोकशाही आणि संविधानाला विरोध करत आहे. भारतात धर्म, भाषा, पैसा, पक्ष प्रदेश वादाची भावना प्रज्वलित करण्यात येथील प्रसारमाध्यमे अग्रेसर असून भ्रष्टाचार व जातीयवादामुळे सांसदीय लोकशाही प्रणाली धोक्यात आलेली आहे. खासगीकरण, बेरोजगारी महागाई, यामुळे अराजकता माजली असून अशावेळी लोकशाहीला वाचविण्याकरिता सामान्यातील सामान्य माणसाने सातत्याने संविधानाचा जागर केला पाहिजे.

Kolhapur
21-2-19

Scanned by CamScanner

सोमवार ता. ११ फेब्रुवारी २०१९ | संकेत टाइम्स

# राष्ट्रीय सेवा योजना ही श्रमसंस्काराची कार्यशाळा : बाळासो पवार

जत (प्रतिनिधी):

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची खरी जडणघडण ही राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होत असल्याने ती श्रमसंस्काराची कार्यशाळा आहे असे प्रतिपादन कोसारी गावचे उपसरपंच बाळासो पवार यांनी केले. ते राजे रामराव महाविद्यालय, जत राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजे कोसारी येथील विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना बोलत होते. पवार पुढे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रम संस्कार शिबिरात झालेल्या संस्कारामुळे विद्यार्थ्यांच्या मनाची व शरीराची योग्य ती मशागत होते. त्यामुळे हे संस्कार विद्यार्थ्यांना आयुष्यभराचे पुंजी ठरतात. या श्रमसंस्काराने प्रशिक्षित झालेल्या युवा पिढीने गावागावात समाजकारणावर भर द्यावा व गावचा विकास साधावा असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीनिवास भोसले, प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. व्हि. एस. ढेकळे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून राजे रामराव महाविद्यालयास 'उत्कृष्ट महाविद्यालय' व डॉ. राजेंद्र लवटे यांना 'उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी' म्हणून सांगली जिल्हा स्तरीय द्वितीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. सतीशकुमार पडोळकर यांनी, आभार कार्यक्रम अधिकारी प्रा. कृष्णा रानगर यांनी मानले. सरपंच तानाजी बिसले, मुख्याध्यापक सुरेश सावंत, किसन टेंगले, नाथा पाटील, सुरेश खरात, बापूसाहेब महारनूर आदी मान्यवरांबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सदस्य प्राध्यापक, स्वयंसेवक-स्वयंसेविका, ग्रामस्थ उपस्थित होते.

21-2-2019

Scanned by CamScanner

दै. मानदूत
14/02/2019

# काळीज उतु गेले की कविता जन्माला येते-प्रा.कुंतीनाथ करके



जत (प्रतिनिधी):-अज्ञानामुळे दारिद्र्य येते आणि दारिद्र्यामुळे गुन्हेगारी येते या तिन्ही गोष्टीची वाट लावायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणामुळे मन, मनगट, मस्तक यांचा विकास होऊन मानवाचा आत्मा संतुलित राहतो म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे असे प्रतिपादन प्रसिध्द शाहीर व मराठी चित्रपट गीतकार प्रा. कुंतीनाथ करके पाटील यांनी केले.

राजे रामराव महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व क्रीडा दिनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. यावेळी महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य श्रीमंत जोत्स्नाराजे डफळे, श्रीमंत शार्दुलराजे डफळे, अॅड. प्रभाकर भाऊ जाधव, नगरसेवक उमेश सावंत, नगरसेवक प्रकाश माने प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे व कार्याध्यक्ष प्रा. सी. वाय. मानेपाटील यांच्या हस्ते प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीचा थाप देऊन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन केले जाते. अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते, स्फूर्ती मिळते.

प्रारंभी कार्याध्यक्ष प्रा. सी. वाय. मानेपाटील यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे अहवाल वाचन केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाण, शिल्ड यांचे बक्षीस वितरण करण्यात आले. त्यांचे वाचन प्रा. एस. डी. चव्हाण यांनी केले. यावेळी स्टुडन्ट ऑफ इयर २०१८-१९ चे सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून एम. एस्सी. शाखेतून श्री प्रशांत यादव, बी. एस्सी. शाखेतून श्री चंद्रकांत बरकडे, बी. ए .शाखेतून श्री गणेश चव्हाण व बी. कॉम., बी. सी. ए. शाखेतून श्री सलमान मुल्ला यांचा सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून गौरव करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.सी.वाय.माने-पाटील यांनी तर सूत्रसंचालन प्रा. कुमार इंगळे व आभार प्रा. श्रीमंत ठोंबरे यांनी केले.

21-2-2019

Scanned by CamScanner

दै. माणदेश एक्सप्रेस
दि. 14/02/2019

# काळीज उतु गेले की कविता जन्माला येते : शाहीर प्रा.करके-पाटील




**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत/प्रतिनिधी दि.१४ :** अज्ञानामुळे दारिद्र्य येते आणि दारिद्र्यामुळे गुन्हेगारी येते या तिन्ही गोष्टीची वाट लावायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणामुळे मन, मनगट, मस्तक यांचा विकास होऊन मानवाचा आत्मा संतुलित राहतो म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे असे प्रतिपादन प्रसिध्द शाहीर व मराठी चित्रपट गीतकार प्रा. कुंतीनाथ करके पाटील यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व क्रीडादिनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. यावेळी महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य श्रीमंत जोत्स्नाराजे डफळे वाहिनीसाहेब, श्रीमंत शार्दुलराजे डफळे, अॅड. प्रभाकरभाऊ जाधव, नगरसेवक उमेश सावंत, नगरसेवक प्रकाश माने प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे व कार्याध्यक्ष प्रा. सी. बाय. माने-पाटील यांच्या हस्ते प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

दुधाची साय जशी वर येते तसे शेतकऱ्यांच्या मुलांनी अभ्यास करून वर आले पाहिजे. आज २१ व्या शतकात कर्तबगार मुलगा निर्माण होणे, हीच खरी संपत्ती आहे असे सांगून शाहीर कुंतीनाथ करके-पाटील पुढे म्हणाले की, पोटाला भाकरीबरोबरच मनाला मनोरंजन लागते आणि हे दोन्ही मिळाले तरच मन शांत होते. दूध ज्याप्रमाणे उतू जाते त्याप्रमाणे काळीज भरून आले म्हणजे शब्दांचे दूध उतु जाते आणि त्यातूनच कविता जन्म घेते, असे सांगून त्यांनी मराठी चित्रपटातील अनेक गीतांचा जन्म कसा झाला हे सांगितले. बहारदार गाणी व पोवाडे सादर करून गीतकार प्रा. कुंतीनाथ करके यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन केले जाते. अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते, स्फूर्ती मिळते. प्रत्येक क्षेत्र चांगले आहे फक्त विद्यार्थ्यांनी आपण ज्या क्षेत्रात काम करणार आहे, त्या क्षेत्राचा सखोल अभ्यास केला पाहिजे. विद्यार्थी जीवनात अभ्यास करून आपले उचित ध्येय गाठले पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले.

प्रारंभी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व श्रीमंत रामराव महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी कार्याध्यक्ष प्रा.सी.बाय. माने-पाटील यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे अहवाल वाचन केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाण, शिल्ड यांचे बक्षीस वितरण करण्यात आले. त्यांचे वाचन प्रा. एस. डी. चव्हाण यांनी केले. या शैक्षणिक वर्षात ज्या प्राध्यापकांनी उल्लेखनीय कार्य केले, अशा प्राध्यापकांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला यावेळी स्टुडन्ट ऑफ इयर २०१८-१९ चे सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून एम. एस्सी. शाखेतून प्रशांत यादव, बी. एस्सी. शाखेतु चंद्रकांत बरकडे, बी.ए. शाखेतून गणेश चव्हाण व बी. कॉम., बी.सी.ए. शाखेतून सलमान मुल्ला यांचा सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून गौरव करण्यात आला. सकाळी सुरुवातीस विद्यार्थ्यांसाठी शेलापागोट्याचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सी. बाय. माने-पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुमार इंगळे व आभारप्रदर्शन प्रा. श्रीमंत ठोंबरे यांनी केले.

21-2-2019

Scanned by CamScanner